## प्रकरण – पहिले

# प्रास्ताविक

# प्रकरण १ ले

# प्रास्ताविक

'दक्षिण काशी' म्हणून ओळखले जाणारे कोल्हापूर हे द. महाराष्ट्रातील सर्वात मोठे संस्थान होते. अनेक संस्थानांचे केंद्र म्हणून कोल्हापूर संस्थान हे अग्रेसर होते. याच्या नियंत्रणाखाली सर्व संस्थानांचे कारभार चालत होते. कोल्हापूर संस्थान हे महाराष्ट्राच्या नैऋत्येकडे असून या संस्थानची स्थळसीमा पूर्वेस कृष्णा नदी आणि बेळगाव जिल्हा, पश्चिमेस सह्याद्री पर्वत रांगा, दक्षिणेस बेळगाव आणि उत्तरेस वारणा नदी आहे. डोंगर, नद्या व जंगलसंपत्ती मुबलक असल्याने कोल्हापूर संस्थानाला सुंदर असे रम्य स्वरुप प्राप्त झाले आहे. कोल्हापूर संस्थानाच्या पश्चिमेकडे सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगा व पूर्व बाजूस सपाट मैदानाची शेतजमीन आहे. या संस्थानातून कृष्णा, वारणा, पंचगंगा, भोगावती, तुळशी, कुंभी, कासारी, दूधगंगा, वेदगंगा, हिरण्यकेशी, घटप्रभा आणि मलप्रभा या नद्या वाहत असून, त्या पूर्ववाहिन्या आहेत. विशाळगड, बावडा, रांगणा, पन्हाळा, पावनगड, भुदरगड असे सुप्रसिद्ध किल्ले या प्रांतात आहेत. कोल्हापूर संस्थानची हवा समतीतोष्ण आहे. पर्जन्यमान सरासरीने ४०° इंच आहे. सह्याद्री पर्वताच्या भागात झाडी विपुल आहे. येथे सागवान, हिरडा, नाना, किंजळ, ऐन व बांबू यांची पैदास मोठ्या प्रमाणावर होते.

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनात कोल्हापूरला वेगळेच असे स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण व महत्वाचे स्थान आहे. कोल्हापूर संस्थानला प्राचीन काळापासून समृद्ध अशी परंपरा आहे. इथल्या गादीचा वारसा प्रत्यक्ष छ. शिवाजी महाराज यांच्यापर्यंत पोहोचतो. १७१० मध्ये ताराराणीने स्वतंत्र गादी स्थापन केल्यापासून कोल्हापूरला भारताच्या नकाशात राजकीय स्थान प्राप्त झाले. १ मार्च १९४९ च्या विलिनीकरणापर्यंत कोल्हापूरने आपले स्वातंत्र्य टिकवून ठेवले.

विसाव्या शतकात राजर्षी शाहू महाराज व छत्रपती राजाराम महाराज यांनी सामाजिक व राजकीय चळवळीस एक नवीन दिशा दिली. याचबरोबर कृषी क्षेत्रातसुद्धा मोठ्या प्रमाणात योगदान दिले कारण कोल्हापूर संस्थानातील लोकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय असल्याने ते उदरनिर्वाहाचे साधन होते. १९०१ ते १९४९ या कालखंडामध्ये कोल्हापूर संस्थानने कृषी क्षेत्रात अनेक सुधारणा केल्या आणि हा बदल दूरगामी परिणाम करणारा ठरला.

प्राचीन काळापासून शेतीला खूप महत्व आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. राष्ट्रीय उत्पन्न समिती व सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशनच्या समितीनुसार एकूण ९० टक्के लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी शेती व्यवसायावर अवलंबून आहेत व शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ४४ टक्के आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशाची आर्थिक समृद्धी व भरभराट मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून असली तरी आर्थिक इतिहासाच्या दृष्टिकोणातून शेती व्यवस्थेला खूप महत्व आहे. शेती आणि शेतकरी हा आपल्या केवळ अर्थव्यवस्थेचाच भाग नव्हे तर संपूर्ण समाजरचनेचा कणा असतो. आर्थिक दृष्टिकोनातून केल्या गेलेल्या अभ्यासाला आज इतिहासात खूप महत्व प्राप्त झाले आहे. कोल्हापूर संस्थानचे कृषीविषयक धोरण (१९०१ ते १९४९) हा विषय याच दृष्टिकोनातून निवडलेला आहे. १९०१ ते १९४९ या काळात कोल्हापूर संस्थानने कृषी क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. त्याचा सखोल अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

या कालखंडात केल्या गेलेल्या सुधारणांचे श्रेय प्रामुख्याने राजर्षि शाहूंना व त्यांचेच धोरण पुढे चालवलेल्या छत्रपती राजाराम महाराजांना जाते. राजर्षि शाहूंनी शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी जाणीवपूर्वक कोल्हापूर संस्थानात नवनवे प्रयोग व क्रियाशील संशोधन याची कास धरली. शेतकऱ्यांनी नवनव्या तंत्राचा आणि यंत्राचा वापर करावा

यासाठी किंग एडवर्ड ॲग्रिकल्चर इन्स्टिट्यूट या नावाची संस्था १९११ मध्ये सुरु केली. शेतीविषयक प्रदर्शने भरविली. १९०९ मध्ये राधानगरी धरण बांधून हरितक्रांतीचा पाया घातला. १९०४ चा सहकार चळवळीचा कायदा आपल्या संस्थानात १९१२ मध्ये लागू करुन कृषी क्षेत्रात सहकाराचे तत्व अवलंबले. दुष्काळाच्या वेळी रयतेला साऱ्यामध्ये सूट दिलेली आहे. शेतीच्या जोडधंद्याची वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. कर्ज वसुलीसाठी सावकाराने शेतकऱ्याचे उभे पीक जप्त करण्याची दुष्ट पद्धत मोडून काढण्याचा वटहुकूमही काढला.

छत्रपती राजाराम महाराजांनीही शेतकी शाळा, आयर्विन ॲग्रिकल्चर म्युझियम यांची स्थापना केली. उद्योग व विकासाला चालना देण्यासाठी कोल्हापूर शुगर मिलची उभारणी केली. बँका, साखर कारखाने यांची स्थापना करुन सहकार चळवळीला उत्तेजन दिले. आज पश्चिम महाराष्ट्र सहकार चळवळीत अग्रगण्य समजला जातो. त्याचे काही श्रेय छत्रपती राजाराम यांचेकडे द्यावे लागेल. कर्जमुक्ती कायदा करुन छत्रपती राजाराम यांनी आपल्या संस्थानातील गरीबातील गरीब शेतकऱ्याकडेही लक्ष दिल्याचे दिसून येते. शेतीच्या विकासासाठी व शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती व्हावी यासाठी त्यांनी राधानगरी धरणाची उंची वाढवली. पंचगंगा नदीवर राजाराम बंधारा १९३९ मध्ये बांधून पूर्ण केला.राजारामकालीन या बंधाऱ्यांना आता महाराष्ट्र सरकारने पाणी अडवण्याचे आदर्श धोरण म्हणून स्वीकारले अहे. कमी खर्चातील 'कोल्हापूर पद्धतीचे बंधारे' ही योजना आज भारतभर पसरली आहे. यामुळे ऊस शेतीचा विकास झाला. हरितक्रांती होऊन जिल्ह्यात धवलक्रांती झाली.

२० व्या शतकात भारतात व महाराष्ट्रात अनेक शेतकऱ्यांचे उठाव झालेले दिसतात. परंतु, १९०१ ते १९४९ या कालखंडात शाहू महाराज व राजाराम महाराज यांनी अनेक शेतीविषयक सुधारणा केलेल्या असल्याने कोल्हापूर संस्थानातील शेतीची

स्थिती समाधानकारक होती असे दिसते. मात्र राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत शेतकऱ्यांचे काही प्रश्नही निर्माण झाले होते हे शिरोळ पेट्यातील शेतकऱ्यांच्या मोर्चामुळे लक्षात येते. एका बाजूला कृषीपूरक असे संस्थानी धोरण, शेतीचा घडून आलेला विकास तर दुसऱ्या बाजूला शेतसाऱ्याच्या संदर्भातील काही प्रश्न असे परस्परविरोधी घटक दिसून येतात. त्यांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर जमिनधारणा पद्धती, त्यामध्ये झालेले बदल, सारावसुली पद्धती, पिकांचे प्रकार, त्याखाली असणारे जमिनीचे क्षेत्र, महसूल गोळा करणारे अधिकारी इ. बाबींचाही अभ्यास होणे गरजेचे आहे. तसेच या कालखंडात पाणीपुरवठ्याच्या सुविधा कोणत्या होत्या, तगाई स्वरुपात कर्जाची व्यवस्था होती का, शेतकी शिक्षण देणाऱ्या संस्था कोणत्या होत्या, शेतकरी सहकारी संघाची भूमिका कोणती होती, सहकार चळवळीचे शेतकऱ्यांना फायदे झाले का, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मात करण्यात आली का, शेतसाऱ्यामध्ये सूट दिलेली होती की का, दुष्काळात कोणत्या उपाययोजना केल्या होत्या इ. सर्व प्रश्नांचाही वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधामध्ये करण्यात आला आहे.

राजर्षि शाहू व छत्रपती राजाराम यांच्या कार्यावर अनेक संशोधकांनी प्रकाश टाकलेला आहे. पण प्रामुख्याने राजकीय व सामाजिक पैलूवर अभ्यास झालेला आहे. डॉ. खणे, बी. डी. यांचा Shri Shahu : A Study of Socio – Political Reforms (1884-1922) हा अप्रकाशित, पीएच. डी. प्रबंध, किंवा डॉ. एम. डी. नलवडे यांचा Chh. Shahu of Kolhapur Social Revolutionary (1874-1922) हा पीएच. डीचा अप्रकाशित प्रबंध असून त्यामध्ये शाहूराजांच्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास केलेला आहे. तसेच Latthe, A. B. यांचा Memories of His Highness Shri. Shahu Chh. Maharaja of Kolhapur, पी. बी. साळुंखे यांचा राजर्षी शाहू गौरवग्रंथ तसेच डॉ.

आप्पासाहेब पवार यांचा राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ यासारखे राजर्षी शाहूंच्या कारकीर्दीवर अनेक गौरवग्रंथ देखील उपलब्ध आहेत.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या कार्यांचा अभ्यास Dr. A. R. Mane यांनी छत्रपती राजाराम व त्यांचा काळ (१९२२ ते १९४०) ह्या अप्रकाशित पी. एच. डीच्या शोधप्रबंधामध्ये केला आहे. तरी देखील कृषी व्यवस्थेसंबंधी त्यामध्ये फार माहिती येत नाही. Dr. T. S. Patil यांचा M. Phil च्या अप्रकाशित प्रबंधामध्ये छ. राजारामकालीन सामाजिक व राजकीय चळवळीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. डॉ. श्रीधर हेरवाडे यांच्या छ. राजाराम चरित्र ग्रंथामध्ये (१९८३) छ. राजाराम यांचे चरित्र त्रोटक स्वरुपात मांडले आहे. तसेच भास्कर धाटावकर संपादित छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश भाग –१ यामध्ये त्यांचे शेतीसंबंधी काढलेले आदेश प्रसिद्ध केलेले आहेत. राजर्षि शाहूंच्या कारकीर्दीवर अनेक गौरवग्रंथही उपलब्ध आहेत.

शाहूंच्या व राजाराम महाराजांच्या कारकीर्दीतील विविध पैलूंवर स्वतंत्रपणेही अभ्यास केला गेला आहे. परंतु १९०१ ते १९४९ असा सलग कालखंड कृषीव्यवस्थेच्या संदर्भात अभ्यासला गेलेला नाही. विशेषत: या दोन्हीही राज्यकर्त्यांच्या प्रयत्नांमुळे येथे ज्या मूलभूत सुधारणा कृषीव्यवस्थेमध्ये घडून आल्या त्या आजही महत्त्वाच्या आहेत. राधानगरी धरण किंवा राजाराम बंधारा सारख्या योजनांची प्रस्तुतता आजही टिकून आहे. म्हणून या विषयाला आजही महत्त्व आहे.

प्रस्तुत अभ्यासासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर केला आहे. कोल्हापूर पुराभिलेखागारात अनेक अस्सल कागदपत्रे उपलब्ध आहेत. यामध्ये शाहू दप्तर, शाहू रुमाल, छ. राजाराम रुमाल, जनरल फाईल्स, पॉलिटिकल फाईल्स, ज्युडिशियल फाईल, शेतसाऱ्यासंबंधी फाईल, पोलीस फाईल्स, होम डिपार्टमेंट, प्रजापरिषद चळवळीची फाईल, हुजूर ठराव बुक इ. अस्सल अप्रकाशित संदर्भ साधनांचा

संशोधनासाठी उपयोग केला आहे. त्याचबरोबर करवीर सरकारचे गॅझेट, कोल्हापूर संस्थानचे सामान्य प्रशासन अहवाल, स्मरणिका इत्यादी प्राथमिक व दुय्यम अशा मराठी व इंग्रजी साधनांचा उपयोग कोल्हापूर संस्थानातील कृषीव्यवस्था (१९०१ ते १९४९) एक अभ्यास या शोधप्रबंधासाठी करण्यात आला आहे.

शोधप्रबंधाची विभागणी पुढील प्रकरणामंध्ये केली आहे.

१) प्रस्तावना

२) कोल्हापूर संस्थान – भौगोलिक पार्श्वभूमी

३) कोल्हापूर संस्थान – ऐतिहासिक पार्श्वभूमी

४) कोल्हापूर संस्थानातील कृषी व्यवस्था – पार्श्वभूमी

५) संस्थानचे कृषी विषयक धोरण – १९०१ ते १९४९

६) उपसंहार

**प्रकरण पहिले – प्रस्तावना**

यामध्ये विषय निवडण्याची कारणे, उद्दिष्टे, प्रस्तुतता व साधने इ. चा उहापोह केला आहे.

**प्रकरण दुसरे – भौगोलिक पार्श्वभूमी**

या प्रकरणामध्ये कोल्हापूरचे भौगोलिक स्थान, त्याची प्रादेशिक वैशिष्ट्ये, या संस्थानात असणारी भौगोलिक विविधता, येथील प्रशासकीय विभाग, या प्रांतातून वाहणाऱ्या नद्या आणि त्यामुळे तयार झालेली नद्यांची खोरी, हवामान, पाऊस यामुळे

घेतली जाणारी पिके आणि त्याखालील लागवडीयोग्य जमीन या मुद्यांची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

**प्रकरण तिसरे– ऐतिहासिक पार्श्वभूमी**

या प्रकरणामध्ये कोल्हापूर हे नाव कसे पडले याविषयी अनेक व्युत्पत्ती सांगितल्या आहेत. तसेच कोल्हापूर प्रांतावर अनेक सत्तांनी राज्य केले त्यामध्ये मौर्य, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार, बहामणी आणि आदिलशहा या परकीय सत्तेनी कोणत्याप्रकारे राज्य केले याची चर्चा देखील करण्यात आली आहे. मराठा कालखंडात इ. स. १७१० मध्ये पन्हाळा येथे मराठी गादीची स्थापना करुन हेच पुढे कोल्हापूर राज्य म्हणून उदयास आले. येथील आबासाहेब, बाबासाहेब, राजाराम महाराज (दुसरे), शिवाजी चौथे याशिवाय ज्यांची कारकीर्द महत्त्वाची मानली जाते ते म्हणजे छत्रपती शाहु महाराज आणि राजाराम महाराज यांच्याविषयी विवेचन करण्यात आले आहेत. १८४५ मध्ये नेमणूक झालेल्या दाजी कृष्ण पंडित या कारभाऱ्याने केलेले खालसा व दुमाला विभाग केले. खालसामध्ये सहा पेट्यांची निर्मिती कोणत्या प्रकारे केली यांची सविस्तर मांडणी केली आहे.

**प्रकरण चौथे – कोल्हापूर संस्थानातील कृषीव्यवस्था – पार्श्वभूमी**

१९०१–१९४९ हा आधुनिक कालखंड जरी असला तरी कोल्हापूर संस्थानात १९ व्या शतकात कृषीव्यवस्था कशी होती याची पार्श्वभूमी मांडणे आवश्यक होते. तरी या प्रकरणामध्ये जमीनीचे प्रकार कोणते होते, प्रमुख धान्ये कोणती होती, लागवडी योग्य जमिनीमध्ये कोणत्या पिकांखाली किती एकर जमीन होती, शेतकऱ्यांचे जीवन, शेती करण्याची पद्धत याशिवाय संस्थानात पडलेल्या दुष्काळावर राज्यकर्त्यांनी कोणत्या प्रकारे मात केली, येथील जमीन धारणेचे आणि इनाम जमिनीचे कोणते प्रकार होते याचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात करण्यात आले आहे.

**प्रकरण पाचवे – संस्थानचे कृषीविषयक धोरण – १९०१ ते १९४९**

१९०१ ते १९४९ हा कालखंड अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण छत्रपती शाहू आणि राजाराम महाराज यांनी शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने कृषी विकासाला अनुकूल अशा अनेक योजना संस्थानात राबिवलेल्या दिसतात. संस्थानच्या कृषीविषयक धोरणामध्ये या कालखंडामध्ये पर्जन्यमानाचा पिकांवर कोणता परिणाम झाला. येथील मुलकी प्रशासन कसे होते, जमीन महसुलात शेतकऱ्यांना सूट दिली होती का, शेतीला लागणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पाणीपुरवठ्याच्या योजना कोणत्या होत्या, शेतकी शिक्षण देणाऱ्या शेतकी शाळा कोणत्या होत्या, शाहू मिल, सहकार चळवळ, शेतकरी सहकारी संघ, शुगर मिल तसेच प्रजापरिषद इ. मुद्यांची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

**प्रकरण सहावे – उपसंहार**

यामध्ये प्रबंधाचा सारांश व अभ्यासातून प्राप्त झालेले निष्कर्ष मांडलेले आहेत.

प्रबंधाच्या शेवटी संदर्भग्रंथ सूची जोडलेली आहेत.